I/120107/2023

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**
**पीरबाजार, उसानपरा, पत्रपेटी क्र.५१६, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५**
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेल: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.: विकाऔ/आस्था-३/२०२३/ 120107 दिनांक : 20/09/2023

**परिपत्रक**

प्रति,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानीत /विनाअनुदानीत संस्था,
छत्रपती संभाजीनगर विभाग

विषय : अधिसुचनेनुसार "औरंगाबाद" हे नाव जिल्हा, उप-विभाग, तालुका व गावाचे नाव बदलून "छत्रपती संभाजीनगर" करणेबाबत

संदर्भ : ०१.महाराष्ट्र शासन अधिसुचना राजपत्र असाधारण क्र.४५ दिनांक २४ फेब्रुवारी २०२३
०२.महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब क्र. ३६४, दि. १५.०९.२०२३
०३.मा. अपर मुख्य सचिव महसूल व वनविभाग यांचे पत्र क्रमांक:प्राफेब/२०२३/प्र.क्र.३७/म-१०, दि.१८.०९.२०२३
०४.मा.जिल्हाधिकारी, तथ जिल्हादंडाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्र.२०२३/प्राफेब/२०२३/जमाबंदी/कावी-११६३, दि.१८.०९.२०२३

वरील विषयाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.०२ च्या अधिसुचनेनुसार "औरंगाबाद" हे नाव जिल्हा, उप-विभाग, तालुका व गावाचे नाव बदलून "छत्रपती संभाजीनगर" करण्याबाबत अनुसूचीच्या स्तंभ क्र.१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या महसुली क्षेत्राच्या नावामध्ये अनुसूचीच्या स्तंभ क्र.२ मध्ये नमुद केल्या प्रमाणे बदल करुन छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर जिल्हा, छत्रपती संभाजीनगर उप-विभाग, छत्रपती संभाजीनगर तालुका व गाव "छत्रपती संभाजीनगर" असे बदल करण्यात आलेले आहे.

संदर्भ क्र.३ नुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदरीनुसार "औरंगाबाद विभाग, जिल्हा, उप-विभाग, तालुका व गाव यांचे "छत्रपती संभाजीनगर" अशी अंतिम अधिसुचना (मराठी व इंग्रजी भाषेतील) दिनांक १५.०९.२०२३ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. संदर्भ क्र.०४ च्या आदेशानुसार वरील प्रमाणे नावामध्ये बदल करण्याबाबत आदेशित करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानीत/विनाअनुदानीत संस्थाना कळविण्यात येते की, यापुढे छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर जिल्हा, छत्रपती संभाजीनगर उप-विभाग, छत्रपती संभाजीनगर तालुका व छत्रपती संभाजीनगर गाव असे नाव वापरण्यात यावे.

UMESH TENIPRASAD NAGDEVE
Digitally signed by UMESH TENIPRASAD NAGDEVE
Date: 2023.09.20 18:31:58 +05'30'

(उमेश नागदेवे)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

प्रत :१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
२. या कार्यालयातील सर्व विभागांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव
३. या कार्यालयाच्या भांडार विभागास माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव